**कुळगाव बदलापूरकरांना मिळाला चकचकीत काँक्रिट रस्ता**

**नवीन काँक्रिट रस्त्यामुळे शहरातील वाहतूक कोंडी सुटणार**

**कटाई नाका - अंबरनाथ - बदलापूर - खोपोली मार्गे मुंबई-पुणेला थेट जोडणी**

**मुंबई, डिसेंबर १०, २०२२:** कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीतील कात्रप पेट्रोल पंप ते खरवई बाह्यवळण रस्त्याच्या भागामध्ये, काँक्रीटीचे रस्ते बनविण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आले होते. अलिकडच्या दशकात कुळगाव बदलापूर नगरपरिषद क्षेत्रात विकसित झालेल्या पायाभूत सुविधांसह परवडणाऱ्या घरांच्या उपलब्धतेमुळे मुंबई - पुण्याला रस्ते आणि रेल्वेने चांगली जोडणी मिळाली आहे. तसेच भविष्यात मेट्रोची जोडणी देखील मिळणार असल्यामुळे सामान्य नागरीक स्थायिक होण्यासाठी बदलापूरला प्राधान्य देत आहेत.

शहारातील वाढत्या लोकसंख्येमुळे रहदारीत वाढ होऊन वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. त्यासाठी प्राधिकरणामार्फत विस्तारित मुंबई नगरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ३+३ मार्गिका असलेल्या ३.६१ किमीच्या रस्त्याचे बांधकाम बांधण्यात आले आहे. हा संपूर्ण काँक्रिटचा आणि ३० मी. रुंद रस्ता असल्यामुळे नागरिकांची वाहतूक कोंडी आणि खड्ड्यांपासून सुटका होणार आहे. तसेच राज्य महामार्ग ४३ आणि राज्य महामार्ग ७६ मार्गे मुंबई पुणे जोडला जाणार असल्यामुळे नागरिकांच्या प्रवासाच्या वेळेत बचत होणार आहे. पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा होण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा पूर्ण लांबीत पर्जन्य जलवाहिन्या तसेच पादचारी मार्ग बांधण्यात आला आहे. तसेच सदर प्रकल्पात ५ मो-यांचा समावेश आहे.

"प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रातील विकास आराखड्यानुसार या रस्त्याचे बांधकाम करण्यात आलेले आहे. भविष्यात मेट्रो १४ ची या भागाशी जोडणी लक्षात घेता या रस्त्यालगत ४० एकर जागा कारशेडसाठी राखीव ठेवण्यात आली आहे" अशी माहिती एमएमआरडीएचे महानगर आयुक्त श्री एस. व्ही.आर.श्रीनिवास यांनी दिली.














30


कात्रप पाडा